
मुग्धमन
सचिन निकम

# मुग्धमन

© सर्व हक्क सुरक्षित

**रचनाः सचिन कृष्णा निकम**

बी - 706 मॉन्ट वर्ट ग्रॅंड

पाषाण, सुस रोड

पुणे - 411021

मोबाईल ः 9890016825

email: sachinikam@gmail.com

# मनोगत

"मुक्तस्पंदन" च्या सुयशानंतर आणि रसिकांच्या भरभरून प्रतिसादाने पुढचे पाऊल टाकताना आत्मविश्वास तर वाढलाच होता पण त्याचबरोबर काहीतरी नवीन करण्याची जिद्द निर्माण झाली .

माझ्या कविता मला पावसासारख्या भासतात . मोकळया नभात जसे कुठुनतरी काळे ढग जमतात आणि त्यांना गार वारे लागले की धो धो बरसतात आणि बरसायला लागले की मग काही खरे नसते . हातातली सगळी कामे खोळंबून ढग रिकामे होईपर्यंत एका नव्या विश्वात वावरावे असे वाटते .

काही वेळा त्या वळवाच्या तर काही वेळा श्रावणाच्या रिमझिम धारा . काही वेळा चातक तहानलेला असतो आणि वर नभाकडे आस लावून बघतो पण नभ मात्र दाटतच नाहीत .

प्रत्येक मूडची एक वेगळीच मजा असते ती आपण अनुभवत असताना अधीर होऊ नये असे मला वाटते . वेगवेगळे मूड नसते तर आयुष्य किती कंटाळवाने असते होय ना .

रिमझिम रिमझिम सरी सरसरल्या

चिंब चिंब अंग भिजवून गेल्या

डोळे मिटूनि चेहऱ्यावर झेलल्या

पसरूनि हात गिरक्या घेतल्या

न राहिले भान कसलेच मजला

वेचले ओंजळीत सारे आनंदक्षण

मलाही न कळले कसे जाहले असे **"मुग्धमन"** .

श्री . कुणाल हजेरी यांनी माझ्या कविता प्रकाशनाची आणि वितरनाचे धाडस केले . ह्या निमित्ताने त्यांचे विशेष आभार .

# अर्पणपत्रिका

आदरणीय आजी आजोबा आणि आई बापू
ज्यांनी माझ्यावर सुसंस्कार केले आणि भरभरून प्रेम केले .

प्रिय पत्नी सौ . ममता हिने वळोवेळी प्रात्साहन दिले
आणि माझ्या कवितांवरही तितकेच प्रेम केले .

# अणुक्रमणिका

1 . विष्णुमहिमा

2 . क्रोध म्हणजे जणू मृत्युचा शोध

3 . मनमित्र

4 . मुक्तस्पंदन

5 . ओंजळीत चंद्रमा ही कोजागिरी पौर्णिमा

6 . चंद्रमा नभी आणि ती जवळ उभी

7 . मधुरमिलन

8 . प्रेमासाठी काहीही...

9 . माझ्यासंग लगीन करशील का?

10 . पाव्हणी कोण ती?

11 . येना राजसा

12 . विरहवास

13 . का कुठुन दाटले घन?

14 . अश्रूझरा

15 . घे उड्डाण!

16 . जल्लोष

17 . मूकस्पंदने

18 . ऊठ ऊठ रे मर्द मराठ्या

19 . पंचवीशीतला वयोवृद्ध

20 . ...एकाच माळेचे मंत्री

21 . घेऊनि सरी आली परी

**22 .** अंगाईगीत

**23 .** उन्हाळयाची सुट्टी

**24 .** मलाबी फॉरेन दाखवा (लावणी)

**25 .** आमची मुंबई

**26 .** आजमाके तो देख

27. My Mind

**28 .** तिने केल प्रेम

**29 .** ऐसी होगी वो

**30 .** परी की काय जणू

## 1 . विष्णुमहिमा

**4 डिसेंबर 2010**

सहस्त्र तुझी नामे देवा वैकुंठ तुझे धाम

अनंत तुझी रूपे देवा अचिंत्य तुझे काम

तूच पुराणपुरूष करिशी प्रकृतीचा आदि मध्य अंत

तूच वेदांत घेशी अवतार उद्धारशी साधुसंत

धर्माच्या संस्थापनेला भक्तांच्या रक्षणाला

धावशी भूमंडळी तू प्रत्येक युगायुगाला

मत्स्य कूर्म वराह बनला पृथ्वी तारायला

नरसिंह वामन परशुराम प्रकटला अहंकार मारायला

राम कृष्ण बुद्ध जन्मला तत्वज्ञान सांगायला

कलियुगे श्वेताश्वरूढ कलकी दुष्टदुर्जन पांगायला

घनश्याम वनमाळी तू रमशी वृंदावनी - द्वारका

त्रिवार नमन तुला हे ब्रह्मांडनायका

शंख पांचजन्य नि चक्रसुदर्शन

गदा कौमोदिकी नि कमलपुष्प, चतुर्भुज धारका

तूच परमात्मा,  भगवंत तूच न कोणी ईह तुझ्यासारखा

रमणीय रमणीय सागर क्षीर

शेषभुजंग शय्या त्यावर स्थिर

प्रसन प्रसन्न मुख तेजस्वी
सोबती सेवामग्न श्री लक्ष्मी देवी
मधुर मधुर रूप मनोहर
गरूड विहंग वाहन तत्पर
सुंदर सुंदर रचशी ब्रह्मांडे
अवघ्या श्वसनाने पद्मनाभा

जानशी सर्वजीवांचे हाल तूच सर्वज्ञानेश्वर
मनोहारी सुरूप तुझे तूच सर्वसुंदर
चक्रगदा आयुधे हाती तूच सर्वशक्तीमान
वलय तेजस्वी युक्तीपूर्ण तूच सर्ववीर्यवान
त्रैलोक्यस्वामी परंतप तूच सर्वबलवान
भासे उणीवशून्य सारे तूच सर्वऐश्वर्यसंपन्न

## 2 .क्रोध म्हणजे जणू मृत्युचा शोध

**28 ऑक्टोबर 2010**

क्रोधात् भवति सम्मोहः सम्मोहात् स्मृतीविभ्रमः

स्मृतीभ्रशांत् बुदि्धनाशो बुदि्धनाशात् प्रणश्यति

भगवद्गीता 2 . 63

नको राग अति करे मनाची भ्रमंती

होता मनाची भ्रमंती क्षण सारे भुलती

भुलता क्षण सारे लोप पावते स्मृती

पावता लोप स्मृती वळते विनाशाकडे मती

वळता मती विनाशे येते जीवावर आपत्ती

ओढवते अशी स्थिती होते संपूर्ण दुर्गती

तुटतात सारी नातीगोती होते -हास धनसंपत्ती

लागत नाही कुठे रती विझतात उत्कर्षाच्या वाती

म्हणून जयाला असेल करावयाची प्रगती

तयाने आवरावा आधि राग अति .

निर्मळ निवळलेले मन होते गढूळ

पडता तयात क्रोधाचा ढेकूळ

विस्कटती सारे आनंदतरंग, होतो गलित सारा मोद

सकलजनी जानावा गीतेचा बोध

क्रोध म्हणजे जणू मृत्युचा शोध

आडवा जर आला राग करावा त्वरित त्याचा त्याग

क्रोध म्हणजे यशाच्या राजमार्गावरील गतीरोध

क्रोध म्हणजे जणू विकाळ मृत्युचा शोध .

## 3 . मनमित्र

**26 सप्टेंबर 2010**

आयुष्याच्या वाटेला वळणे अन् चढऊतार

कोण यईल सोबतीला बनेल सुखदुःखाचा जोडीदार

ठेवील हिशोब क्षणाक्षणांचा देईल जीवनाला आकार

ऊसळेल चैतन्य रोमरोमांत छेडील विलक्षण झंकार

समजने विकट ह्याला द्यावा सोडून अट्टाहास

नको वैर कदापि बनावे मित्र खास

गट्टी करून ह्याच्याशी व्हावे जितेंद्रिय न दास

सुटता नियंत्रण ह्याचे होती भलते सलते आभास

जमेल राहणे पाण्यात झाल्यावर दोस्त मीन

येईल आनंद जगण्यात झाल्यावर दोस्त मन

सोसाटला वारा अंगवस्त्र उडाले

झुडुपावर बोरीच्या अडकले

घाई केली तर रूततील काटे

ओढले कसेही तर सगळेच फाटे

हळुवार चहुबाजुंनी अलगद उचलुनि

घ्यावे जवळ गोडीने सारे कंटक काढुनि

ल्यावे परत झटकुनि अस्से घट्ट बांधुनि

राखेल लज्जा तेचि घेईल भावडे सावरूनि

रमतो मिलिंद फुलाफुलांवर

भ्रमते. मन चंचल क्षणाक्षणांवर

मन म्हणजे खुशाल चेंडू

कधी सुगंधी गुलाव

कधी केशरी झेंडू

कधी खुलते जसा मयूरपिसारा

कधी झुलते लाटा सागरकिनारा

कधी वाट चुकलेले वासरू

कधी उंच उडणारे पाखरू

कधी हट्टी रूसलेले लेकरू

कधी ताली नाचणारे घुंगरू

सांजसकाळ संगे ह्याच्या साधतो मी सुसंवाद

आंबट गोड तिखट क्षणांचा अनुभवतो आस्वाद

कृष्णधवल आयुष्याचे रंगले पूर्ण चित्र

मन जेव्हा माझे झाले माझे परम्मित्र .

# ४ . मुक्तस्पंदने

**29 सप्टेंबर 2010**

आयष्याच्या वाटेवर आयुष्य काय ते जगायला

भविष्याची चिंता सोडून दिलखुलास वागडायला

काहीतरी करायचय नवं झुगारून सारी बंधने

एका स्वरात गंफुदे अपुली मुक्तस्पंदने

फुंकुनि चिंता वाऱ्यावरी करू जोमाने सराव

जिंकायाचा आहे आता आपल्याला हा डाव

पाषाणालाही येते देवपण सोसता टाकेचे घाव

अचिंत्यशक्ती दडलीय तुझ्यात असुदे तुला ठाव

उगवत्या सूर्यालाच करती जनमानस वंदने

एका स्वरात गंफुदे अपुली मुक्तस्पंदने

मोद नवा कणांत मुरला हर्ष नवा क्षणांत विरला

धनतरंग क्षितिजावर पसरले नवचैतन्य दिशांत विखुरले

नाही आता भय कसले चल वेचूया क्षण मंतरले

घेता हाती हात तुझा काळीज कसे गहिवरले

मंत्रमुग्ध एकमेकांत होऊनि नाचूया आनंदाने

एका स्वरात गंफुदे अपुली मुक्तस्पंदने

# 5 . ओंजळीत चंद्रमा ही कोजागिरी पौर्णिमा

26 ऑक्टोबर 2010

ओंजळीत चंद्रमा न्याहळू किती प्रियतमा

उमटली क्षीरसागरी पूर्ण चंद्राची प्रतिमा

तुषार पीयुषांचे उधळले धरणीवर

रंगरूप नवेनवे आला सृष्टीला बहर

पाहिला मी अवर्णनीय महिमा

बंध प्रीतीचे जुळवाया आली कोजागीरी पौर्णिमा

ओंजळीत चंद्रमा न्याहळू किती प्रियतमा

चंदनाहून शीतल सुमनांहून कोमल

सुरूप तुझे मनात भरले जागवून निराळी हलचल

झुळुक गार सुटली हिमवृष्टीच जणू भासली

जाहला अपूर्व करिष्मा

बंध प्रीतीचे जुळवाया आली कोजागीरी पौर्णिमा

ओंजळीत चंद्रमा न्याहळू किती प्रियतमा

निशिगंध दरवळला घेऊनि सुगंध प्रीतीचा

तळहातावरचा अजुनि रंगला ओला रंग मेंदीचा

दुग्धशर्करा योग आजचा नि नभी चंद्रमा

राजहंस युगुल, दोघे मिळुनि साजरी कोजागिरी पौर्णिमा .

## 6 . चंद्रमा नभी आणि ती जवळ उभी

**20 ऑक्टोबर 2010**

चंद्रमा नभी आणि ती जवळ उभी

तरंगला निःश्वास हलका हलका पाहुनि तिची छबी

झुळुक गार गार अशी झोंबली कशी

हेलकावले मन नौका लाटांवर जशी

चंद्रमा नभी आणि ती जवळ उभी

आवेगली मंदधुंद स्पंदने

साकारली स्वप्ने, वरदा सुरभि

उमटली हृदयात प्रतिमा तिचीच फक्त

वेभान प्रेम माझे कसे करू शव्दांत व्यक्त

चंद्रमा नभी आणि ती जवळ उभी

पाजळले शीतामृत शशीचे आली काळजात भरती

झंकारले प्रणयसुर प्रीतीच्या आरंभी

बरसल्या प्रीतधारा भिजले सर्वांग चिंब

पाहिले तिच्या डोळयांत मी माझेच प्रतिविंब

# 7 . मधुरमिलन

**16 ऑगस्ट 2010**

(ती श्रृंगार करत असते त्याला भेटण्यासाठीआणि स्वतःला आरशात न्याहाळून गुणगुणते)

तीः हंऽऽऽ मंऽऽऽ मंऽऽऽ अंऽऽऽ

लाऽऽऽ लाऽऽऽ लालाऽऽऽ लाऽऽऽ

(सार्यांच्या नजरा चुकवत लपत छपत दवक्या पावलांनी निघते)

कोरसः सासा सारे गमप

पप पध धनिसा

मम मग गरेसा

गरेसा गरेसा गग

धनिसा धनिसा धध

सानिसा सानिसा सानिसाऽऽऽ

(पैंजनांचा आवाज करत ती त्याचे लक्ष वेधून घेते)

छुन् छुन् छुनन् छनुन् छुन्

(तो उत्सुकतेने शोधतो आणि दोघे एकमेकांना धडकतात)

तीः (लाजून ईश्य

(तो प्रसन्न नजरेने तिच्याकडे पाहतो ती माघारी फिरते

तो तिचा हात पकडतो आणि तिच्या डोळ्यांत पाहात

डोके मान हलवून विचारतो, काय?)

तीः (मान नकारार्थी डोलावून हळुवार स्वरांत) काही नाही .

तोः खर सांग नको लाजू

तीः क क कुठे काय काहीच नाही

तोः हंऽऽऽ...

(पाठ फिरवतो) बर मग जाऊदे .

तीः काही सांगायाचे आहे

काही बोलायाचे आहे

काही ऐकायाचे आहे

काही जाणायाचे आहे

तोः (वळतो . आश्चर्यचकित पण प्रेमळ नजरेने तिच्याकडे पाहतो)

...काय बरे

तीः ईश्य मला लाज वाटते

तोः (तिला जवळ घेतो . तिचे दोन्ही हात हातात धरून तिच्या डोळ्यांत पाहातो .

जरी ती लाजत असली तरी तिची हनुवटी उजव्या हाताच्या ओंजळीत धरतो . )

काय सांगायाचे आहे

आता वाट कसली पाहे

तीः तू ना... (प्रेमळ कटाक्ष टाकते आणि चूप बसते)

तोः आवेगली स्पंदने (ऊत्सुकतेने)

जाहली पूर्ण चंद्रकला

भिडला श्वास गगणाला

आली भरती सागराला

तीः ...आवडतोस तू मला (आणि लाजून पळते)

तोः अगं अगं थांब चाललीस कुठ

ऐकले नाही काहीएक नीट

तीः भेटते नदी जशी अथांग सागराला

उमलते कळी जशी पाहुनि भ्रमराला

खुलते मीही तशीच प्रिया पाहुनिया तुजला

तोः उमगले गुपीत सारे

दरवळले सुगंधी वारे

बोलती लुकलुकते तारे

मिलनाने तुझ्या प्रिये जाहले प्रसन्न आसमंत सारे

तीः मी तुझी अन् तू माझा

राणी मी रूपमती तू विक्रमी राजा

तोः प्रिये... तु सुद्धा मला फार आवडतेस

(तिला फूल देऊन मिठीत घेतो . )

तीः गोल गोल गिरक्या घेते आनंदाने नाचते

भरला आनंद नभात सारा

फुलला मनमोराचा पिसारा

लागले रोमरोम नाचू माझे

सप्तसुर दाही दिशांत वाजे

पाहिले सुखद स्वप्न जे

साकारले प्रत्यक्षात ते

तोः ये साजनी

तीः ये साजना

दोघे मिळुनिः

गाठी रेशमी बांधल्या गगणी

गाऊ प्रीतीची गाणी वेधुंद होऊनि

नाचू मस्तीत राजाराणी हातात हात घेऊनि

तुझ्यासाठी मी आणि माझ्यासाठी तूच

आलो भेटाया या धरिणी

सहवसात तुझ्या जाहले धन्य हे जीवन

राहूदे साथ अखंड अशी सांज आली “मधुरमिलन” .

(दोघे हातात हात घालुन आनंदाने बागडतात . )

## 8 .प्रेमासाठी काहीही...

**6 ऑक्टोबर 2010**

तुझ्या प्रेमासाठी प्रिये करेन मी काहीही
स्मित चेहऱ्यावरचे ढळू देणार नाही कधीही
माळावया गजरा सखे गुंफीन टपोर चांदणे
येशील ना धावुनि सये ऐकुनि माझे गाणे

तू अशी आवडतेस मला
तू तशीपण आवडतेस मला
तू जशी आहेस तशीच
तू कशीपण आवडतेस मला

तुझ्या प्रेमासाठी प्रिये करेन मी काहीही
प्यावया पाणी तुला आणेन वळवून नदीही
परिमळ साऱ्या फुलांचा आणेन ओंजळीत
देशील का साथ प्रिये पाहुनि वेडी प्रीत

तुझ्या एका हसण्याने मन माझे सुखावले
जवळी तुझ्या बसण्याने रोमरोम हर्षावले

तुझ्या प्रेमासाठी प्रिये करेन मी काहीही
बनेन पुरूषोत्तम श्रीराम तू माझी वैदेही
परीसस्पर्शाने देईन तुला आणून मृगकांचनी
उतरतील नभतारका लेऊनि सौंदर्य लोचनी

तुझ्या असण्याने शुष्क कंठ झाला ओला
तुझ्या नसण्याने सखे जीव अबोला अबोला

तुझ्या प्रेमासाठी प्रिये करेन मी काहीही
बनेन श्रीकृष्ण मुरारी तू राधा बावरी
होशील मग्न वृंदावनी ऐकुनि मधुर बासरी
संगे तुझिया रासलीला प्रीतगंध रोमरोमांत पसरी

तुझ्या जवळ येण्याने आसमंत दरवळला
तुझ्या एका पाहण्याने श्वास श्वासात विरघळला

तुझ्या प्रेमासाठी प्रिये करेन मी काहीही
नाही जमला ताजमहाल
बांधीन इवलेसे घरटे
राजाराणी नांदू सुखाने
गाऊ मिलनगीत आनंदाने .

## 9 . माझ्यासंग लगीन करशील का

**10 ऑक्टोबर 2010**

माझ्यासंग लगीन तू करशील का ग पोरी
हळद लावुनि अंगाला होशील का माझी गोरी

खुळ तुला लागले वाटत चल दूर हो पोरा
माझ्या समोर नाही चालायाचा तुझा फुका तोरा

अगं छावा मी मर्द गडी तुझ्या नावाने काळीज धडधडी
छावी हो तू माझी तुझ्यासाठी जीव धडपडी
समजून घे मला ग तू ये जवळ थोडी थोडी

नाही मी ऐकणार काही नको लावू उगी लाडीगोडी
नाही मी भुलनार अशी कितीही केलीस जरी तू कुरघोडी

माझ्यासाठी तू अन् तुझ्यासाठी मी जन्मलो
सोड ना आता काडीमोडी
थक्क होईल दुनियासारी पाहुनि लक्ष्मीनारायणाची जोडी

माझ्यासंग लगीन तू करशील का ग पोरी
हळद लावुनि अंगाला होशील का माझी गोरी

मला लय काम हाय मला जमायच न्हाय
नाही सवड मला दे सोडून नाद खुळा

अगं पैलवान मी मराठमोळा केलीय तालीम वर्षे सोळा
हो माझी तू चंद्रकला झालाय तुझ्यासाठीच जीव खुळा
उमजनि घे मला ग तू नुसती येतेस स्वप्नात येरवाळी

मला समदं हाय ठाव तुझी नजर माझ्याव
आले बिगिबिगि चुकवुनि सार्यांचा डोळा

माझ्यासाठी तू अन् तुझ्यासाठी मी जन्मलो
सोड ना आता दुरावा
थक्क होईल दुनियासारी पाहुनि
पार्वतीशंकर भोळा
टाकयला अक्षता येतील देव गंधर्व
बघायाला अपूर्व लग्नसोहळा

माझ्यासंग लगीन तू करशील का ग पोरी
हळद लावुनि अंगाला होशील का माझी गोरी

दिलखुलास तू जोडीदार माझा

मी तुझीच राणी तू राजा माझा

साफमनाचा तू जीवलग माझा

ने मला वाजवत सनई बॅंडवाजा

हुर्रेऽऽऽ जमलं हो जमलं...आहाऽऽऽ

## 10 . पाव्हणी कोण ती?

**7 ऑक्टोबर 2010**

पाव्हणी कोण ती बघुनि मला लाजली
पैंजनी पाऊले सुमधुर सुमधुर वाजली
डोळ्यांत तिच्या मी सारी इंद्रनगरी पाहिली
एकटक नजर माझी तिच्यावर टिकून राहिले

पाव्हणी कोण ती पाहुनि मला हसली
मेणका की काय जणू काळजात ठसली
खळखळणारा झरा जणू निर्मळ हास्य वाहिली
चाहूल माझी लागता पाठमोरी का राहिली

पाव्हणी कोण ती बघुनि मला हरवळली
कस्तुरीमृग की काय जणू रोमरोमांत दरवळली
सावरूनि ओढणी केसांसवे तिच्या खेळली
अजुनि समीप जाता बिजली अंगांअंगात सळसळली

पाव्हणी कोण ती बघता बघता हरवली
शोधू कुठे तिला असावी कदाचित करवली
नकळत चुकवुनि डोळा काय जादू झाली
भेटेल का पुन्हा कधी लावून आस ती गेली

## 11 . येना राजसा

**4नोव्हेंबर 2010**

राजसा ! ये जवळी येना तू असा

उमटला काळजावरी तुझ्या प्रीतीचा ठसा

झाला पुरे आता हा अबोला

आठवणींच्या अश्रूंनी झाला पदर ओला

कळलीय माझी चूक मला

खुळा जीव तुझ्यावर जडला

राजसा ! ये जवळी येना तू असा

आहे संपूर्ण तुझ्यावर भरवसा

सोडना उगा रूसवा फुगवा

मिटूदे आता बेचैन दुरावा

तुझ्या प्रीतीने आसमंत फुलावा

हिंदोळ्यावर प्रेमाच्या शीतलचंद्र झुलावा

राजसा! ये जवळी येना तू असा

मी सुकुमार राजकुमारी तू देखणा राजहंसा

घनेरी केसांचा घालते विळखा रेशमी

दरवळते भवती सुगंधी अत्तर शबनमी

पाहुनि तुला ना राहिले माझीच मी

दे हात हाती मंतरले क्षण वदामी .

## 12 . विरहवास

**6 ऑक्टोबर 2010**

तोः

तुजविन मज करमत नाही

तुजसोडून मन रमत नाही

दिसतेस तू सर्वत्र पाहता काही

गुंजते तुझीच हाक दिशांत दाही

साठवलेल्या आठवणींना देतोय ऊजाळा

हर्ष तोच रोमरोमांत फिरतोय निराळा

गोडगुलाबी थंडी बेधुंदी देते आठवण मधुचंद्राची

रंगबेरंगी सुगंधी फुले देती चाहूल तुझ्या येण्याची

ऐश्वर्य सगळे इथे नांदते

पंचतारांकित इथले जगणे

फक्त तुझ्याविना शून्य हे सगळे

तुला वगळता रिक्त हे जगणे

माझी तुलाही येत असेल ना आठवण

पाहुनि आरशात हळवे होत असेल ना मन

तीः

झालीय तुझ्यासारखी माझी स्थिती

काटतेय दिवस कसेबसे बदलते कुशी राती

तोः

प्रतिबिंब शशीचे सागरावर उमटले

कण वाळुचे लाटांसंगे झुलले

आठवुनि क्षण मिलनाचे मन माझे फुलले

पण तू सोबती नसल्याने पुन्हा हिरमुसले

तीः

न लागे गोड घास मुळी तुझ्याविना

न भागे तहान डोळी पाहिल्याविना

दरवाज्यावर बसलेय लावून खुळी नयना

ये लवकर परत घरी जीव कासावीस साजना...

तोः

न्याहाळतो मुखडा प्रतिमेत तुझा

कुरवाळतो उशी मिठीत खुळा

थोडेच उरलेत दिवस परतीला

चंद्रकलेने सुटले उधान भरतीला

बरसता रिमझिम श्रावणधारा

मिळेल तृप्ती आतुर धरतीला .

## 13 . का कुठुन दाटले घन ?

**20 ऑक्टोबर 2010**

का कुठुन दाटले घन मनात ?
कसा पडला काळोख लख्ख उन्हात
का कुठुन पेटला वणवा उरात
कसा अडखळला श्वास गाताना सुरात

काय कसे हे विपरित घडले
अघटित सारे शोकसागरात बुडले
का कशी क्षणभर स्पंदने थांबली
सरेना दिन नि रात्र अजूनच लांबली...

का कुठुन दाटले घन मनात ?
कसे गोठले अश्रू तप्त उन्हात
कुठुन घोंगावले वादळ काळजात
कसा दुरावला स्पर्श मायेचा घर करून हृदयात .

## 14 . अश्रूझरा

**11 ऑगस्ट 2010**

कुणीच कुणाचे नसते का इथे?

जो तो शाधतो आपापले रस्ते

ढळती अश्रू केविलस्वराने  काटा पायी रूते

खांद्यावरच्या ओझ्याने कंबरडे वाकते

केला आक्रोश किती मदतीला ना कुणी धावते

कुणीच कुणाचे नसते का इथे?

जो तो भरतो आपापली कोठारे

रिकाम्या कणगीलाही माझ्या घूस का पोखरते

ओघळती अश्रू भूकेने, आग पोटात वाहते

मागू कुणा जेवण, घास मायेचा भरवील कोण

कुणीच कुणाचे नसते का इथे?

जो तो परिधानतो आपापाल्याला वस्त्रे

शिवल्या फाटक्या चिंध्या वारे बोचरे टोचते

गोठती अश्रू कंठ दाटे नाचती अंगावर शहारे

काय पांघरू अन् काय अंथरू गोधडी अजुनच फाटते

कुणीच कुणाचे नसते का इथे?

जो तो बांधतो आपापले बंगले

छत आकाशाचे डोक्यावर गळते

सरसरती अश्रू पावसात मिसळती

निःशब्द ओठ फक्त थरथरती

कोण देईल विसावा, कोण बनेल वाली

आधार कुणाचा जीवाला, हसू कोण देईल गाली

आकाशवाणीः

एकटेच येतो इथे, एकटेच परत जातो

काहीच नसतो आणत येताना नेतही काहीच नसतो

पाझरणार अश्रूझरा कधीपर्यंत...

पुन्हा नव्याने कर सुरूवात नको करूस अंत

सुखदुःखाचा हा खेळ गड्या खेळ बिनधास्त सोड खंत

ठेव जपून अमूल्य ठेव होशील तू यशवंत .

# 15 . घे उड्डाण !

**12 ऑगस्ट 2010**

घे उड्डाण घे घे उड्डाण
थांवू नको आता भिऊ नको आता
नको मागे वळू शोध नव्या वाटा
जोखमीचे काम आहे गड्या तू जाण
… घे उड्डाण !

हवे जे आहे तुला आहे तुझ्याचपाशी
कशाला दोष पाहशी कुंडली नि राशी
नको करू खंत होशील तू जयवंत
झेलायाला आव्हाने एकवटून बळ अनंत
भिड विनधास्त नि उडव दाणादाण
… घे उड्डाण !

नाही जमणार बसून आता झोपायचे तर मुळीच नाही
ठेव ध्यास ध्येयाचा चौफेर अभ्यास विषयांचा
कर सामना नेटाने आडवे आले जरी तुफान
… घे उड्डाण !

सोड अंधाराची भीती पेटव नव्या वाती

घेऊनि मशाल हाती ऊजळुदे घन्या राती

जोशमध्ये होशचे असूदे जरा भान

… घे उड्डाण !

पंखामध्ये भरूदे आता शतपटीने वळ

मेहनत कर प्रयत्न कर मिळेल इच्छित फळ

सापडे हिरा खणता कोळशाची खाण

… घे उड्डाण !

घे उड्डाण घे घे उड्डाण

उंचावयाची आहे तुला आमची मान

असूदे एकच ध्यान फडकावयाचे विजयाचे निशान

… घे उड्डाण !

## 16 . जल्लोष

**20 ऑक्टोबर 2010**

नवी विटी नवे राज्य नवा नवा जयघोष
जल्लोष करूया जल्लोष जललल्लोष

नवी उमेद नवी उमंग ताजातवाना जोश
जल्लोष करूया जल्लोष जललल्लोष

मस्तीत नाचूया मस्तीत गाऊया
बेधुंद होऊनि सारे खेळ नवा खेळुया
आता नाही भीती कसली
शतपट बाहुबळ नि कंबर कसली
नको कुणाचा फुका रोष
जल्लोष करूया जल्लोष जललल्लोष

आता सुटतील सारी कोडी
नव्या शिडाची नवी होडी
आता मिटतील साऱ्या यातना
कौशल्यपूर्ण नवनव्या योजना
नको यंत्रणेला उगा दोष
जल्लोष करूया जल्लोष जललल्लोष

रंग तेच पण चित्र नवे

फुले तीच पण गंध नवे

सुर तेच पण ताल नवा

शब्द तेच पण अर्थ नवा

आकाश तेच पण झेप नवी

प्रश्न तेच पण उत्तरे नवी

वक्तृत्व नवे कर्तृत्व नवे

नभी नक्षत्रांचे तारेही नवे

नव्या दमाचा नव्या पिढीचा नवानवा ज्ञानकोश

जल्लोष करूया जल्लोष जललल्लोष

## 17 . मूकस्पंदने

**26 सप्टेंबर 2010**

काय केला गुन्हा की कुकर्म पूर्वजन्मीचे
सरेना हा भोग तोडू कशी ही बंधने
हिरावले स्वातंत्र्य कशी मूक झाली स्पंदने

शुष्क कंठ दाटलेला झरा अश्रूंचा आटलेला
खेळ नियतीने थाटलेला पतंग अस्मितेचा फाटलेला
घनदाट अंधार सभोवताली दाटलेला
उडणार कसा पक्षी पंख छाटलेला
उजळतो हिरा लाभता कांचनी कोंदने
सांगू कुणाला कशी मूक झाली स्पंदने

दिशाहीन भरकटलेले निशादिन फरफटलेले
भडके उदरात भूकेचा जाळ
संपेल कधी असह्य कर्दनकाळ
जाण्यायेण्याने जगात का होई विटाळ
पैलतीरा कसे जाऊ खोल पाणी गढूळ गाळ
ये धावुनि मदतीला देवा करतो शतकोटी वंदने
हाका तरी मारू किती कशी मूक झाली स्पंदने

## 18 . ऊठ ऊठ रे मर्द मराठ्या

**5 नोव्हेंबर 2010**

ऊठ ऊठ रे मर्द मराठ्या

डोळे उघडुनि उठ खडसावुनि

टाकून दे ती जीर्ण घोंगडी

झटकुनि टाक गलित गोधडी

माथ्यावर ऊन सोनसळी आले

जाग आता जग जागे झाले

आठवण असूदे इतिहासाची

नको वेळ आता उपहासाची

नुसत्याच कथा चघळू, पूर्वज पराक्रमाची

दवडू नकोस सुवर्णसंधी,  उघड द्वारे कर्तृत्वाची

ऊठ ऊठ रे मर्द मराठ्या

डोळे उघडुनि उठ खडसावुनि

सह्याद्रीचे कडे गर्जती

गडकिल्ले जलदुर्ग अर्जती

गोदा कोयना केविलस्वरे विनवती

संथ कृष्णामाई चंद्रभागा अर्वती

सुजलाम् सुफलाम् मायभू अपुली

साधुसंतांनी मायबोली जपली

कणा तूच या राष्ट्राचा असूदे सार्थ अभिमान

मशागतीने मेहनीतेने फुलुदे माळरान

ऊठ ऊठ रे मर्द मराठ्या

डोळे उघडुनि उठ खडसावुनि

साद देती नव्या दिशा हाक देती नव्याआशा

अभिजात सुर, अभिजात ताल, अभिजात लय

घुमुदे झंकार गगणी विरूदे सारे भय

घेऊनि जुन्याचा वारसा पाहा आधुनिकतेचा आरसा

भरूनि उभारी उरात घे उंच भरारी गगणात

घेतला वसा सोडू नकोस, नांदेल ऐश्वर्य अंगणात .

# 19 . पंचवीशीतला वयोवृद्ध

**8 नोव्हेंबर 2010**

भिंगाचा चष्मा डोळयावर चढवून

तासन्तास खुर्चीत वसतो वाकून

स्थूलपणा बसलाय पोटात घर करून

हरवलाय चपळपणा आणि म्हणे मी चिरतरूण

कमकुवत स्नायु अन् हाडे झाली ठिसूळ

चरबीचा कोट त्यावर चढवून

दिनरात संगणक मोबाईल अन् इडियट बॉक्सचा लळा

हेच माझे काम मित्र आणि हाच माझा विरंगुळा

मैदानी खेळ म्हटले की कंटाळा चिकटला

अंगमेहनत करायला रामराम ठोकला

स्टाईलमध्ये खातो पिझ्झा सबवे बर्गरकिंग

भेटती मित्रमंडळी ऑरकुट फेसबुक सोशल नेटवर्कींग

फास्टफूड खाऊन मी फास्ट फॉरवर्ड झालोय

असा कसा मी पंचवीशीतच वयोवृद्ध झालोय

पछाडलेय बीपी डायबेटीस नि हायपरटेन्शन

कॅन्सर नि काय काय ने वेधलेय अटेन्शन

सम्यक् आहार नि सम्यक् विहार

सम्यक् आचार नि सम्यक् विचार

सम्यक् कर्म नि सम्यक् निद्रा

नको वायफळ बडबड नको धांदल गडबड

नको उगा ती क्षुल्लक कारणावरची चिडचिड

नियमीत व्यायाम नि जपावे हरिनाम

सुदृढ देही सुदृढ मनाचे धाम

असावे पंचवीशीत तपोवृद्ध  ज्ञानवृद्ध

केस पिकवून कंबरडे वाकवून नका बनू वयोवृद्ध

जगताना पहावे जगण्यावर प्रेम करून

किती सुंदर हे जीवन आहे म्हणतील नेत्र चिरतरूण .

## 20 . ...एकाच माळेचे मंत्री

**19 डिसेंबर 2010**

एकाचढीत एक ह्यांच्यासारखे हेच
सोडवण्याऐवजी लांबवती निकाली पेच
हुतुतु हुतुतुतुतु धर तंगड खेच
सत्तेसाठी जरी फुटला गुडघा लागली ठेच
बळी तो कान पिळी हेच ब्रीद अंतरी
कितीही निवडले तरी हे एकाच माळेचे मंत्री

ढवळया शेजारी बांधला पवळया वाण नाही पण गुण लागला
खाऊन खाऊन फुगला तरी अजुन दम कसा नाही लागला
नव्याचे नवच दिवस खुर्चीमिळेपर्यंतच चांगला
येता हाती सत्ता परोपकाराचा सदरा खुंटीला टांगला
रयत असते भावडी, असली तर असुदे राहुदेकी अधांतरी
कितीही घोळले तरी हे एकाच माळेचे मंत्री

विधायक कामे म्हटली की धरला कडक उपवास
खोदकाम नि खानेकाम मात्र चालू बारामास
धनधान्याची कोठारात सांडतीय ह्यांच्या रास
दीनदुबळया जनतेच्या मुखी मात्र शिळाच घास
न्याहारीला हवे ह्यांना सफरछंद नि संत्री
कितीही पाखडले तरी हे एकाच माळेचे मंत्री

खाऊ पिऊ खुर्चीत बसू, फिरवू ऐटीत लालदिव्याच्या मोटारी
वाढली पुढे ढेरी, नि मागे टेरी, बघा बघा कसा शोभतोय हा “पुढारी”
उन्हातानात राबती कष्टकरी शेतकरी
मधल्यामधेच गब्बर होती व्यापारी
कारण ह्यांना सामील हे बिनबुडाचे वाजंत्री
कितीही चाळले तरी हे एकाच माळेचे मंत्री

जनाची नि मनाची सोडलीय लाज
उद्या कुणी पाहिलाय जे काय करायचय ते आज
असतो तोच विजेता हाती ज्याच्या सत्ता
हीच ह्यांची नीती आणि एवढीच ह्यांची विदवत्ता
धर्माच्या प्रांताच्या नावाखाली चिरडला विवेक पायाखाली
भारतवर्षाच्या पवित्र भूमीची कशी ही दुर्दशा झाली
हे देवा! घे धाव आता, सांगायला ह्यांना गीता गायत्री
कितीही धुतले तरी हे एकाच माळेचे मंत्री

# 21 . घेऊनि सरी आली परी

**22 ऑगस्ट 2010**

एकदा एक परी आली माझ्या घरी

सुंदर तिचे रूप, नाजूक पंख पाठीवरी

फुलांहूनही कोमल गोड गालात हसरी

झाली सुरू तेवढ्यात रिमझिम बाहेरी

चल चल ग परी

झेलू पावसाच्या सरी

ढोल वाजविले ढगांनी

गुंजली वाऱ्याची बासरी

खुळखुळली घुंगरे झऱ्यांची

किलबिलले पक्षी झाडांवरी

परी म्हणाली चल जाऊ ढगांवरी

पाहू सारे नजारे बसुनि अधांतरी

ओलेचिंब झाडेवेली, हिरवी नक्षी शेतांवरी

ओढे झरे खळखळणारे, अंथरले गालिचे डोंगरावरी

रिमझिम रिमझिम झरती सरी

आले क्षण आनंदाचे सोनेरी

शक्य कसे होईल ग हे परी?

रिमझिम पावसाची चाललीय जोरात भारी

ओले झाले रस्ते सारे

चिंब न्हाली झाडे सारी

जादूची छडी आहे माझ्याकडे खरी

चल झेलूया सरी अंगावरी

पानंवरून ओघळणारे कौलांवरून टिपटिपनारे

चल वेचूया ओंजळीमध्ये मोती सारे चमचमनारे

वाव! किती मज्जा किती छान!

तो बघ कळप गाईंचा, चरतोय डोंगरावर कुरण

तो पहा थवा पक्ष्यांचा, उडाला पंख फडकावून

मऊमऊ ढगांच्या गादीवरून दिसतेय सुंदर घर माझे उठून

कोवळ्या कोवळ्या उन्हाच्या छटा नेसल्या सरी हरकून

हसले गाली इंद्रधनु कमान सप्तरंगांची बांधून

वाटे असेच तरंगावे, उंचच उंच उडावे

सोबती तुझिया परी सारे जग पहावे

चल लवकर घरी संध्याकाळ झाली

वाट पाहात असेल आई पाणी भरून डोळी .

# 22 . अंगाईगीत

**20 ऑक्टोबर 2010**

निज निज रे बाळा निज निज रे निज हंऽऽ हंऽऽ

मिटुनि डोळे निज निज रे बाळा निज

खेळ खेळुनि दमुनि आलं

दूध पिऊनि मोट्ठ झालं

निज निज रे बाळा निज निज रे निज हंऽऽ हंऽऽ

मिटुनि डोळे निज निज रे बाळा निज

चिवचिव चिऊ झोपली घरटी

हंबाहंबा गाई झोपली गोठी

उद्या येतील तुझिया भेटी

तूही जा झोपी चिमुकल बाळं हंऽऽ

निज निज रे बाळा निज निज रे निज हंऽऽ हंऽऽ

मिटुनि डोळे निज निज रे बाळा निज

घेउनि मांडीवर थोपटते बाळा

पाळण्यात हळुहळु जोजावते तुला

लागला मजला बाळाचा लळा हंऽऽ

## 23 . उन्हाळयाची सुट्टी

**11 डिसेंबर 2010**

हुर्रेऽऽऽ

संपली रे संपली वार्षिकची परीक्षा

संपली रे संपली सुट्टीची प्रतीक्षा

लागली रे लागली सुट्टी उन्हाळ्याची

भेटणार माणसे आवडीची जिव्हाळ्याची

सुटले एकदाचे अभ्यासाचे बंधन

घालायचे आता धांगडधिंगन

चिंटू पिंटू राजू सुमन

पळा चला खेळू धरा गोल रिंगन

पाटी नि दप्तर ठेवलय कपाटात बंद

पिऊ सरबत, खाऊ आईस्क्रीम चॉकलेट नि गुलकंद

कालच मामाचा आला होता फोन

आंबे खायला येणार कोण कोण?

आजोळला असते खूप खूप मज्जा

खेळायला क्रिकेट गण्या नि राजा

आईबाबा म्हटलेत जाऊया फिरायला

माथेरान गोवा की महावळेश्वरला?

झुकझुक टॉयट्रेन मध्ये बसू

टपटप घोड्यावर ऐटीत बसू

वेण्णा तलावात बोटींग करू

देखावे नि पॉईंट सारे फिरू

हेऽऽऽ

उन्हाळयाची सुट्टी मला आवडते फार फार

कारणकी असते सुट्टी सलग सोमवार ते रविवार .

## 24 . मलाबी फॉरेन दाखवा (लावणी)

**12 डिसेंबर 2010**

इलेक्शनच वार गेल बहुमतान निवडून आल

लालदिव्याच्या मोटारीतून ऐटीमंदी फिरू लागल

मंत्री बनून संत्री खाऊन फॉरेनच्या दौऱ्याची मिजास करून

उगाच भाव खाऊ नका, खाऊ नका, आसं दूर जाऊ नका...

आव धनाजीराव एक नीट ध्यानामंदी ठेवा

गावरान माळाचा डोंगरचाळाचा हाय मी खमंग मेवा

एबीशीडी येते मलावी लिटल इंग्रजी शिकवा

मी पण येणाराय तुमच्यासंग मलाबी फॉरेन दाखवा

सोडा सोडवा हिचा रूसवा

हिला विमानामंदी लवकर बसवा

जीनच्या पॅंटीवर घ्यावा टीशर्ट हिरवा

हिला समद जग रावा फिरवा

फॉरेनची ऐकलीय वेगळीच तऱ्हा

नवेनवे कपडे सुटकेशीत भरा

पहिल्यांदा पॅरीसला जावू आयफेल मनोरा पाहू

इटलीत पिझ्झा नि पास्ता खावू , स्पेनला रोमॅंटीक गाणी गावू

स्विझर्लॅडला हिमवर्षावात न्हावू, रातीला लंडनच्या पॅलेशात राहू

थंडी कडाक्याची लय हायका तुमासनी ठावू

गार गार वाऱ्यात चांदण्या ताऱ्यात हव ते आइस्क्रीम चाखवा

मी पण येणाराय तुमच्यासंग मलाबी फॉरेन दाखवा

सोडा सोडवा हिचा रूसवा

हिला विमानामंदी लवकर बसवा

काळा गॉगल डोळयावर मिरवा

हिला समद जग रावा फिरवा

गगणचुंबी न्यूयॉर्कच्या इमारती बघायचाय पुतळा लिबर्टी

नायग्रा फॉल नि मोठाले मॉल जावूया शॅापींग करायला

जोडीन फोटो काढू हॉलीवूडला,  जावूया शूटींग बघायला

शहरी हवेचा नि लहरी चवीचा आयटम एखादा चाखवा

मी पण येणाराय तुमच्यासंग मलाबी फॉरेन दाखवा

सोडा सोडवा हिचा रूसवा

हिला विमानामंदी लवकर बसवा

काळजावरी हिचच नाव गिरवा

हिला समद जग रावा फिरवा

आव आस काय करता दाखवा ना...

आं हांऽऽऽ हंऽऽऽ

मी पण येणाराय तुमच्यासंग मलाबी फॉरेन दाखवा

## 25 . आमची मुंबई

**20 ऑक्टोबर 2010**

मुंबई मंबई आमची मुंबई

जहॉं होते हैं साकार सपने पराये हो जाते हैं अपने

ऐसी इसकी जादू दुनिया पे है छायी

लेकर खुशियॉं कितनी आमची मंबई आयी

मुंवई मंवई आमची मुंवई

बॉलीवूड की मायानगरी सितारों की झगमगाहटमे मस्त

फॅशनकी जादूगरी अपनीही धुन मे रहती है व्यस्त

कोनेकोनेसे दुनियाके फनकार यहॉं पे है आते

अपनी अपनी किस्मत यारो यहीं पे आजमाते

कोई बिगबी, कोई किंग, बादशाह ऑफ बॉलीवूड कहलाते

अपनी लाजवाब अदाकारीयोंसे दर्शकोंका दिल वहलाते

ऐश बिपाशा, प्रियांका कॅटरीना, सबके दिलों पे करती राज

माधुरी प्रीती, राणी करीना, बनती धडकन की आवाज

जोहर गोवारीकर, सुपरहिट फिल्मे बनाते

डिरेक्टरस् कट देते, चोप्रा भन्साळी घाई

लेकर हसीन सपने आमची मुंबई है आयी

भैयाः

यह है बम्बई नगरीया तू देख बबूवा

मुंबईकरः

अरे तुला एकदा सांगितलेल कळत नाही का का देवू...

भैयाः

समझ गये समझ गये भाऊ

ये है मुंबई नगरीया तू देख बबूवाऽऽऽ

उंची उंची मंजिले आसमानों को छूती

चकाचौंद गलियॉं ना रातों को सोती

कुलाबा नरिमान पॉईट खिला मलाबार हिल्स

बांद्रा गिरगॉव चौपाटी हसीन  जुहु बीच

गेटवे ऑफ इंडिया से मरीन डाईव्ह

सीएसटीपे देखो आख्खी मुंबई लाईव्ह

महालक्ष्मी मुंबादेवी सिद्धीविनायक मंदीर आया

“गणपती बाप्पा मोरया मंगलमुर्ती मोरया!”

पश्चिम किनारे देखो डूबते हुये सूरज की लाली

झुकता जहॉं सजदे मे सर देखो पाक हाजी आली

मुंबई हमारी जान है मुंबई हमारा ईमान

मुंबई हमको प्यारी है मुंबई आमची शान

मुंबई मंबई आमची मुंबई

खिलखिलाती लहरे समंदरकी, जोश बढाती जीने का

कितने भी आये तुफान जुनुन कायम है जीने का

दिनमे तारे भी दिखलाती गिरके संभलना भी सिखलाती

हररोज की नयी सुबह, नयी उमंगे मनमे लहराती

मुंबई मंबई आमची मुंबई

बेकाबू स्टॉक एक्सचेंज का बैल, उपरनीचे है कुदता

लोकल की भीडमे, दादर जानेवाला अंधेरी उतरता

हिंदुस्थान की आर्थिक राजधानी, देती सबको दानापानी

आओगे एकबार यहॉ , खोजाओगे प्यारमे दिलबरजानी

मुंबई मंबई आमची मुंबई

अंडरवर्ल्ड की वट यहॉ चलती

डेढशाने की बंद करदे बोलती

वसुली किडनॅप, मर्डर की सुपारी लेते

पुलिस भी एनकाउंटर करनेसे डरते

पक्या अस्लम यार अपने, उस्ताद अपुनका मुन्नाभाई

अपुनकाईच चलता राज ये है आमची मुंबई

Late night, weekend and Fashion Parties

अपना अपना रोब दिखाती यहॉं Political prties.

नमस्ते सस्त्रियकाल सलामालिकुं Hello Hiiii

अनेकता मे एकता ऐसी है सजी आमची मुंबई .

## 26 . आजमाके तो देख

**4 नोव्हेंबर 2010**

पलटके देखले इकबार करले मुझसे ऑखे चार
जितना है समंदर मे पानी उतना छलके ऑखों से प्यार
तूही मेरी पहली ख्वाईश दर्दे दिलकी पहली फर्माईश
आजमाके तो देख इकबार होगा यकीन करले ऐतबार

अंबरसे बरसे मोती तेरे मुस्कानेसे
सांजसे हुआ सवेरा पलके झपकानेसे
सागरसे मिलने बलखाती सरिता कदम उठानेसे
महकी खुशबु हवाओंमे जुल्फे बिखरानेसे

पलटके देखले इकबार इतना एहसान मुझपे यार
जितने है आसमान में तारे उतना चमके ऑखों मे प्यार
देखले ऑखों मे मेरे जानले मुझको मेरी जान
बने है हम एकदुजेके लिए है खुदा भी मेहरबान .

# 27. My Mind

17 October 2010

My mind is dear friend of mine
In winter’s chill, comes as a warm sunshine
Drags so crazy without having wine
Gives a ride on the cloud’s with silver line

My mind is dear friend of mine
Mingles with the things of its kind
When I am reluctant, it pushes me from behind
When I strive for something, it makes me blind
Doesn’t stops looking for you, until you get find
When I am sitting alone, thinking of my past,
It renders my life in rewind…

My mind is dear friend of mine
It makes me cry, it makes me smile
Needs to handle with care, it is so agile
Floats like a kite with the wind on such a height
Glitters like a moonlight in the darkest night
When I get bored, it sings songs of my glories
When I am not getting sleepy, it tells me happy stories.

My mind is dear friend of mine

It is so fickle, when I am angry it makes tickle

Sometimes a spoiled brat, sometimes mature like a pickle.

My mind is a painter wonderful

Paints walls of life with rainbow colorful.

## 28 . तिने केल प्रेम

**4 जानेवारी 2011**

तिने केल प्रेम बेसुमार त्याच्यावर
टाकल ओवाळून मन बेफिकीर त्याच्यावर
पाहिली वाट त्याची दिसेपर्यंत तो
लागता चाहूल त्याची हर्ष रोमरोमांत दरवळतो

एकदा भिडल्या नजरा जुळल्या ह्दयांच्या तारा
लागले भेटू दोघे फुलला आसमंत सारा
नव्हते कसलेच भान होते बेधुंद युगुल छान
कसमे, वादे, प्यार, वफा झाले दो दिल एक जान

तिने आपल्या प्रेमाचा एकदिवशी केला उलगडा
वाचला समोर त्याच्या अबोल प्रीतीचा धडा
कळूनही न कळले काही त्या भावनाशून्याला
पाषाणह्दयी शेवटी भेट अश्रूंची देऊनि दूरावला

झाले कठीण विसरणे जपलेल्या भावनांना
उरल्या फक्त आता आठवणींच्या यातना
त्याच काय, तो कसाही सावरेल
तिने केल प्रेम खर, तिला कोण आवरेल ?

## 29 . ऐसी होगी वो

**4 जानेवारी 2011**

मिट जायें सब दूरीयॉं, मजबूरीयॉं
ऐसी मुलाखात हो
लूट जायें सब खुशियॉं, मदहोशीयॉं
ऐसी चॉंदरात हो
खिल जायें सब अरमान, दिलजान
ऐसी बरसात हो

जिसके विना जीना है उदास
जिसकी मुस्कान लाये मिठास
करदे जीवन मेरा वो खास
जिसकी मुझको है तलाश
जिसके लिए दिलमे है प्यास
आजाये सामने वो मेरे काश
देखूं जी भरके चले जबतक सांस

हट जायें सब बेचैनियॉं, बेतावीयॉं
ऐसी सदा साथ हो
थम जायें सब पल यहां, लम्हे यहां
ऐसी कोई बात हो

## 30 . परी की काय जणू

**5 जानेवारी 2011**

जाई, जुई, मोगरा, निशिगंध
चाफा, चमेली, गुलाब, जास्वंद
चालली घेऊनि परडी फुलांची
परी की काय जणू ही आस्मानाची

हळुवार, नाजूक, अलगद पाऊले
नयनरम्य दृश्य, या डोळी पाहिले
शूचिर्भूत दर्शनं घंटानाद मंदिरी
परी की काय जणू ही स्वप्नसुंदरी

मृगनयनी, मदनकन्या, भासे मज रूपमती
जडावे सहजच मन, अशी तिची रती
जाहलो मंत्रमुग्ध, झाली आतुर भेटण्या मती
परी की काय जणू ही लावण्यवती